पोलीस अधीक्षक , कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ५५ दिनांक ०५/१०/२०२२

# पालघर पोलीस दलात स्वतंत्र वाहतूक शाखेची स्थापना

०१ ऑगस्ट २०१४ साली ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. सन २०१४ पासून अद्यापपर्यंत पालघर जिल्हा पोलीस दलासाठी वाहतूक शाखेची निर्मिती करण्यात आलेली नव्हती. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी दिवसेंदिवसा पालघर जिल्ह्यात वाढती वाहतूक कोंडी व रस्ते अपघात यावर नियंत्रण करणेकरीता स्वतंत्र वाहतूक शाखा कार्यान्वीत करण्याचे नियोजीत केले. याकरीता मा.वरीष्ठांच्या पुर्वपरवानगीने वाहतूक शाखेची निर्मिती करण्यात आली.

वाहतूक शाखेसाठी श्री. आसिफ बेग, सहायक पोलीस निरीक्षक यांच्यासह एकूण ५३ पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली. वाहतूक शाखेसाठी नेमणूक करण्यात आलेले प्रभारी अधिकारी श्री. आसिफ बेग यांचेसह एकूण ३२ पोलीस अंमलदारांचे ०७ दिवसांचे वाहतूकीचे प्रशिक्षण पुर्ण करण्यात आले असून उर्वरीत २१ पोलीस अंमलदारांचे प्रशिक्षण हे या आठवड्यात पुर्ण करण्यात येणार आहे. वाहतूक शाखेचे प्रत्यक्षात कामकाज हे आगामी ग्रामपंचायत निवडणूकीनंतर सुरु करण्यात येणार आहे.

आज दि.०५/१०/२०२२ रोजी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांच्या शुभहस्ते वाहतूक शाखेच्या कार्यालयाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक कार्यालयात करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर, श्री. विश्वजीत बुलबुले, प्रभारी अधिकारी नियंत्रण कक्ष पालघर, श्री. सुधिर संखे, प्रभारी अधिकारी जिल्हा विशेष शाखा, श्री. अनिल विभुते, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, श्री आसिफ बेग, प्रभारी अधिकारी वाहतूक शाखा व पोलीस अंमलदार हे उपस्थित होते.



